# अभियांत्रिकी प्रवेशाबद्दल असणा-या शंका व त्यांचे निरसन

**१. प्रथम फेरीत मला सातवा ऑप्शन ॲलॉट झाला आहे , मी प्रवेश निश्चित करावा का ?**

उत्तर : प्रथम फेरीच्या प्रवेश नियमाप्रमाणे तुम्हाला मिळालेला ऑप्शन **प्रथम १ ते ९ यामधे असल्यामुळे तुम्हाला प्रवेश घेणे बंधनकारक आहे.** जरी आपण प्रवेश निश्चित केला नाही तरीही आपल्याला पुढील सर्व प्रवेश फेरीत भाग घेता येणार नाही.

**२. प्रथम फेरीत मला १२ वा ऑप्शन ॲलॉट झाला आहे , मी प्रवेश निश्चित करावा का ?**

उत्तर : प्रथम फेरीच्या प्रवेश नियमाप्रमाणे तुम्हाला मिळालेला ऑप्शन **प्रथम १० ते २० यामधे असल्यामुळे तुम्हाला प्रवेश घेणे बंधनकारक नाही.** पण आपणास तो कोर्स हवा असल्यास आपण प्रवेश निश्चिती करू शकता. मात्र आपण प्रवेश निश्चिती केली तर आपणास पुढील प्रवेश फेरीत भाग घेता येणार नाही. तथापि प्रवेश निश्चित नाही केला तर आपल्याला पुढील प्रवेश फेरीत भाग घेता येईल.

**३. मी दुस-या फेरीत भाग घेण्याऐवजी थेट तिस-या अथवा चौथ्या फेरीत भाग घेऊ शकतो का ?**

उत्तर : आपणास थेट तिस-या अथवा चौथ्या फेरीत भाग घेता येईल. पण त्या प्रवेश फेरीच्या वेळी उपलब्ध असलेल्या जागांवरच आपल्याला गुणवत्तेनुसार प्रवेश मिळू शकेल.

**४. प्रवेशाच्या दुस-या/तिस-या फेरीत ऑप्शन कसे भरता येतील ? व प्रथम फेरीत दिलेल्या ऑप्शनचे काय होईल ?**

उत्तर : प्रत्येक फेरीसाठी नवीन ऑप्शन्स दयावयाचे असल्यामुळे आपण **आधीच्या फेरीत दिलेले ऑप्शन रद्दबातल होतात.** उदा. आपण दुस-या फेरीसाठी पात्र असाल तर कमीत कमी १ व जास्तीत जास्त ३० ऑप्शन्स आपण भरू शकता. पण हे ऑप्शन्स भरताना आपले गुणवत्ता यादीतील स्थान व उपलब्ध जागा यांची योग्य ती सांगड घालावी जेणेकरून आपल्याला दुस-या फेरीत ॲलॉटमेंट मिळू शकेल. तसेच दुस-या फेरीत पहिले १५ ऑप्शन पैकी ॲलॉटमेंट मिळाल्यास प्रवेश निश्चिती करणे बंधनकारक आहे याची नोंद घ्यावी.

**५. प्रवेश फेरीत मला AIEEE व महाराष्ट्र ॲलॉटमेंट अशा दोन्ही ॲलॉटमेंट मिळालेली आहे. तर प्रवेश निश्चिती कशी करावी व दुस-या ॲलॉटमेंटचे काय होईल?**

उत्तर : प्रवेश नियमावलीप्रमाणे आपणास २ ॲलॉटमेंट मिळाल्या असतील तर त्यापैकी आपणाला हव्या असलेल्या केवळ एका ऑप्शननुसार प्रवेश घेता येईल व दुसरी ॲलॉटमेंट आपोआप रद्दबातल ठरेल. एकदा प्रवेश निश्चित केल्यानंतर मात्र AIEEE किंवा महाराष्ट्र ॲलॉटमेंटच्या प्रवेश फेरीसाठी आपण पात्र नसाल. (संदर्भ प्रश्न १ व २ प्रमाणे )